# प्रेस नोट दिनांक २८/०५/२०१९
# चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

## गहाळ झालेला मोबाईल शोधुन दिलेबाबत.

चंदननगर पो.स्टे. चे हद्दीमध्ये राहाणारे श्री. मोहंमद मुबिन रा. पुणे हे दि. २६/०५/२०१९ रोजी रिक्षाने प्रवार करीत असताना त्यांचा मोबाईल फोन २५,०००/- रु. किंमतीचा असा विसरुन राहीलेला होता सदर रिक्षा चालक नामे दत्तात्रय बहिरमल यांनी चंदननगर पोलीस स्टेशन येथे समक्ष येवुन सदरचा मोबाईल जमा केलेने श्री. मोहंमद मुबिन यांचा शोध घेऊन रु. २५,०००/- रु. किंमतीचा मोबाईल परत मिळवुन दिलेली आहे.

श्री. मोहंमद मुबिन यांचे रु. २५,०००/- रु. किंमतीचा मोबाईल रिक्षा मध्ये विसरल्याने ते अत्यंत चिंतातुर व दुखीः झालेले होते परंतु त्यांचा मोबाईल परत मिळवुन दिल्याने त्यांना आनंद होवुन, त्यांनी नमुद रिक्षा चालक, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानुन पोलीस खात्याबद्यल आदराची भावना निर्माण झालेबाबत मनोगत व्यक्त केले आहे.

सदरची चांगली कामगिरी चंदननगर पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी वपोनि कृष्णा इंदलकर व पोनि गुन्हे श्री. राजेंद्र काळे यांचे मार्गदर्शनाखाली ठाणे अमंलदार मदतणीस पोहवा राजु कांबळे, पोशि अमोल कोडीलकर, मपोना अनुराधा बेंद्रे यांनी केलेली आहे.

